RNI Regd. No. 72105/99 ■ सातारा

■ www.rajdand.com Youtube, FB, Insta, Twitter, Koo ■ raj-

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

■ वर्ष २५, ■ अंक १८७ ■ गुरूवार, १३ मार्च २०२४ पश्चिम महाराष्ट्र ■ पाने ८ (सुप्रभात) ■ किंमत रू ५/-

## महत्त्वाचे

### निलेश लंकेंनी चुकीचा निर्णय घेऊ नये

### अन्यथा अपात्र ठरतील अजित पवार यांचा इशारा

**बारामती :** आमदार नीलेश लंके स्थानिक राजकारण वरुन नाराज आहेत,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत एकत्र बैठक घेऊन त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल, मात्र त्यांनी चुकीचा निर्णय घेतल्यास ते कायद्यानुसार अपात्र ठरतील, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना दिला. बारामती तालुक्यातील विविध विकास कामांची उद्घाटने उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी पत्रकारांशी बोलताना आमदार निलेश लंके राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटामध्ये सहभागी होणार असल्याच्या प्रश्नाबाबत अजित पवार यांनी हे स्पष्टीकरण दिले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, आमदार निलेश लंके यांची नाराजी स्थानिक पातळीवरील राजकारणाबाबत आहे. आमच्या एका सहकार्याने आमदार लंके यांच्याशी चर्चा केली, त्यावेळी माहितीतील मंत्र्याबाबत नाराजी असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मी असे एकत्र लंके यांच्यासोबत बैठक घेऊन त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करू. वास्तविक पाहता दोन जुलै रोजी आम्ही माहिती सोबत जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर समोरच्या गटातील नेते विरोधात गेलेल्या एकाही नेत्याला आमच्या गटात घेणार नसल्याचे स्पष्ट केले होते. मात्र आता निलेश लंके यांना कसे काय बरोबर घेत आहेत, याबाबत विचार करण्याची गरज आहे. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या सध्याच्या भूमिकेसंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर अजित पवार म्हणाले, हर्षवर्धन पाटील हे भाजपचे मोठे नेते आहेत. केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी त्यांना राष्ट्रीय साखर महासंघाचे अध्यक्षपद दिले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून त्यांची समजूत काढली जाईल.

# निलेश लंकेंचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश?

## वसंत मोरेंनीही घेतली भेट



**मुंबई / पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसशरदचंद्र पवार पक्षात एक आमदार आणि एका माजी नगरसेवकाचा प्रवेश होत असल्याची चर्चा आहे.शरद पवारयांच्याहस्ते निलेश लंकेंच्या कोविड यापुस्तकाचे प्रकाशनशरद पवारयांच्याहस्ते झाले असून निलेश लंके यांनीराष्ट्रवादी काँग्रेसशरदचंद्र पवार यांच्या विचारधारेवरच मी चालतो, असे म्हटले. मात्र,शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केल्याचं स्पष्टपणे त्यांनी सांगितले नाही. त्यामुळे, लंकेचं नेमकं काय चाललंय, असा प्रश्न कायम आहे. राष्ट्रवादीच्या पुण्यातील कार्यालयात निलेश लंके पोहोचले होते, तर वसंत मोरे यांनीही नुकतेच शरद पवारांची भेट घेतली आहे. त्यामुळे, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठ्या हालचाली पाहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही निलेश लंकेंची समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, लंकेंचा निर्धार पक्का असूनते लोकसभानिवडणूकलढवण्यास इच्छुक आहेत, असे समजते.

आमदार नीलेश लंके स्थानिक राजकारणावर नाराज आहेत. त्यांच्याबरोबर बुधवारी चर्चा झाली. त्यांनी महायुतीमधील मंत्रीमहोदयांबाबत तक्रार केली. त्यासाठी लवकरच लंके यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह आपण बैठक घेणार आहे. यावेळी संबंधित मंत्रीमहोदयांना देखील बोलावून त्यांच्यात आपसात झालेले गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यामुळे चुकीचे काही न करण्याबाबत लंके यांना सूचित केले आहे. आता ते राष्ट्रवादीचे आमदार आहेत. त्यांना आता ते राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आहेत. त्यांना पक्षाचा व्हीप लागू झाला आहे. त्यांना वेगळी भूमिका घ्यायची झाल्यास आमदारकीचा राजीनामा देऊन करावे लागेल, अशी सध्याची परिस्थिती असल्याचं अजित पवार यांनी यापूर्वीच स्पष्ट केलं होतं.

मात्र, निलेश लंकेंनी शरद पवार यांच्यासमवेत पत्रकार परिषद घेतली.

वसंत मोरे यांनी शरद पवारांची भेट घेऊन पुण्यातून लोकसभानिवडणूकलढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्या अनुषंगाने दोघांमध्ये चर्चा झाली असून वसंत मोरेंचं अद्याप काहीही निश्चित झालेलं नाही.

पण, ते लोकसभेसाठी इच्छुक आहेत. दरम्यान, आज निलेश लंके आणि वसंत मोरे हे दोघेही पुण्यातील कार्यालयात शरद पवारांसोबत होते. त्यापैकी, निलेश लंकेंनी शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केला आहे. आता, अहमदनगरमधून ते आगामी लोकसभा निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# हरियाणात राजकीय घडामोडींना वेग

## मुख्यमंत्रिपदाच्या राजीनाम्यानंतर मनोहरलाल खट्टर यांनी आमदारकीही सोडली

हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर कुरुक्षेत्रचे खासदार नायब सिंह सैनी यांनी हरियाणाचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ऐन लोकसभा निवडणुकीच्या आधीच हरियाणात मोठ्या राजकीय घडामोडी सुरू आहेत. मनोहरलाल खट्टर यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर आता त्यांनी आमदारकीचा राजीनामा देण्याची घोषणा विधानसभेत केली. यावेळी विधानसभेत बोलताना मनोहरलाल खट्टर यांनी पक्ष जी नवी जबाबदारी देईल, ती पार पाडणार असल्याचे सांगितले. मनोहरलाल खट्टर हे २०१४ पासून कर्नाल मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करत होते.

मनोहरलाल खट्टर हे लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरण्याची शक्यता आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत हरियाणात मनोहरलाल



खट्टर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी आठ जागांवर भाजपाचे उमेदवार विजयी करण्यात यश मिळविले होते. मनोहरलाल खट्टर यांच्याकडे उत्तम संघटक व उत्तम प्रशासक म्हणून पाहिले जाते. आता खट्टर यांना भाजपाचे वरिष्ठ नेते दुसरी मोठी जबाबदारी देण्याची शक्यता आहे.

मनोहरलाल खट्टर नेमके काय म्हणाले?

मनोहरलाल खट्टर यांनी हरियाणा विधानसभेत बोलताना आमदारकीचा राजीनामा देण्याची घोषणा केली. ते म्हणाले, मी आज कर्नाल विधानसभा मतदारसंघाच्या आमदारकीचा राजीनामा देत आहे. आता नवे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी हे या कर्नाल विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी स्वीकारतील. यापुढे पक्ष देईल ती जबाबदारी मी पार पाडेल.

हरियाणाचे नवे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांच्या सरकारची आज बहुमत चाचणी पार पडली. यावेळी सरकारच्या बाजूने ४९ आमदारांनी मतदान केल्याने त्यांनी विश्वासदर्शक ठराव जिंकला. या ठरावाआधी मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी राज्याच्या विकासाबाबत, राज्यातील राजकीय घडामोडींबाबत जवळपास एक ते दीड तास भाषण केले. त्यानंतर सभागृहात ठराव मांडण्यात आला. यावेळी सरकारने बहुमताने विश्वासदर्शक ठराव जिंकला. यानंतर विधानसभेत

# विनय कोरे हातकणंगलेतून लोकसभा लढवणार?

**कोल्हापूर :** हातकणंगले लोकसभा मतदार संघातून भाजपकडूनलोकसभानिवडणूकीसाठी मी इच्छूक नसल्याचे स्पष्टीकरण शाहूवाडी-पन्हाळ्याचे आमदारविनय कोरेमंगळवारी लोकमतशी बोलताना केली. ही जागा लढवावी असा मला भाजपकडूनही प्रस्ताव आलेला नाही. आणि दिल्लीच्या राजकारणात एवढ्या लवकर जाण्याचा विचार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिवसेना शिंदे गटाचे खासदार धैर्यशील माने यांच्याबद्दल मतदार संघात संपर्क कमी असल्याची नाराजी असल्याची चर्चा भाजपकडूनच सुरु झाली आहे. त्यामुळे त्यांना पर्याय म्हणून आमदार कोरे, भाजपच्या शौमिका महाडिक यांची नावे मुख्यत: चर्चेत आली आहेत. त्यामुळे याबाबत त्यांची नेमकी काय भूमिका आहे हे समजून घेण्यासाठी लोकमतने त्यांच्याशी संपर्क साधला.

आमदार कोरे म्हणाले, जनसुराज्य पक्षाची



भाजपसोबत राज्याच्या निवडणूकीत युती आहे हे खरे आहे परंतू आम्ही आमच्या पक्षाला एकही लोकसभेची जागा मागितलेली नाही. मुळातच माझीच लोकसभा लढवण्याची इच्छाच नाही. हातकणंगले लोकसभा मतदार संघात आमची चांगली ताकद आहे, संपर्क आहे. त्यामुळे कदाचित आमचे नाव चर्चेत आले असावे असे त्यांनी सांगितले.

# माढ्यात उमेदवारी अभावी निराश

# मोहिते-पाटलांच्या भूमिकेकडे लक्ष

**सोलापूर :** पश्चिम महाराष्ट्रासह सर्वांचे लक्ष वेधून राहिलेल्या माढा लोकसभा मतदारसंघासाठी भाजपचे खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यात जोरदार रस्सीखेच होत असताना अखेर निंबाळकरा यांना पुन्हा संधी मिळाली. उमेदवारी डावलली गेल्याने मोहिते-पाटील गटाला धक्का बसला आहे. आता त्यांची भूमिका काय राहणार, याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

मागील २०१९ सालच्या माढा लोकसभा निवडणुकीत फलटणचे रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना भाजपकडून निवडून आणताना ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील हे शिल्पकार ठरले होते. परंतु गेल्या पाच वर्षात खासदार निंबाळकर व मोहिते-पाटील कुटुबीयांत तीव्र मतभेद झाले. भाजप पक्षश्रेष्ठींनीही त्याकडे लक्ष दिले नाही.

या पार्श्वभूमीवर आगामी लोकसभेसाठी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्या विरोधात विजयसिंह मोहिते-पाटील यांचे पुतणे धैर्यशील मोहिते-पाटील यांनी उमेदवारीसाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले होते. एकमेकांविरूध्द शह-काटशह देण्याचेही प्रकार घडले. मोहिते-पाटील यांनी, आता माघार नाही, असा निर्धार करीत प्रतिष्ठा पणाला लावली होती. परंतु अखेर खासदार निंबाळकर यांच्या बाजूने भाजपने कौल देत त्यांना दुसऱ्यांदा संधी दिल्यामुळे मोहिते-पाटील गटाला धक्का बसला आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते रामराजे निंबाळकर यांनीही रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना पुन्हा उमेदवारी देण्यास तीव्र विरोध केला होता. या पार्श्वभूमीवर आता मोहिते-पाटील आणि रामराजे निंबाळकर यांच्याकडून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. तर भाजपकडून मोहिते-पाटील यांची समजूत कशाप्रकारे काढली जाणार ? पुढे कोणत्या घडामोडी होणार, याबाबतही सार्वत्रिक उत्सुकता पसराली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून कोणते राजकीय पत्ते फेकले जाणार, याकडेही सर्वांच्या नजरा खिळल्या आहेत.

## भाजपकडून उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

# महाराष्ट्रातील २० उमेदवार घोषित, पंकजा मुंडे, रक्षा खडसे यांना संधी

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. भाजपकडून लोकसभेच्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर झाली आहे. या यादीत महाराष्ट्रातील २० उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. यादीत भाजप नेत्या पंकजा मुंडे, सुधीर मुनगंटीवार, रक्षा खडसे यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांचा समावेश आहे. जळगावमधून स्मिता वाघ यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर सुधीर मुनगंटीवार यांना चंद्रपूरमधून उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. नितीन गडकरी यांना नागपूरमधून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. बीडमधून पंकजा मुंडे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. रावेरमधून रक्षा खडसे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

कुणाला कोणत्या मतदारसंघातून उमेदवारी जाहीर?

नंदुरबारमधून हिना गावित यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. हिना गावित या सध्या तिथल्या खासदार आहेत. त्या गेल्या १० वर्षांपासून नंदुरबारच्या खासदार आहेत. त्यामुळे त्यांना यावेळी विजयाची हॅटट्रिक करण्याची संधी पक्षाने दिली आहे.

धुळे मतगारसंघातून सुभाष भामेर यांमा उमेदवारी जाहीर झाली आहे. सुभाष भामरे यांच्या उमेदवारीबाबत गेल्या अनेक दिवसांपासून उलटसुलट चर्चा सुरु होती. त्यांचं तिकीट कापलं जाईल, अशी चर्चा सुरु होती. पण पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना पुन्हा संधी दिली आहे.

जळगाव मतदारसंघात भाजपने धक्कातंत्राचा अवलंब केला आहे. जळगावात भाजपने विद्यमान खासदार उन्मेष पाटील यांचं तिकीट कापलं आहे. या ऐवजी माजी आमदार स्मिता वाघ यांना उमेदवारी देण्यात आली आहे. स्मिता वाघ भाजपच्या विधान परिषदेच्यादेखील आमदार होत्या. तसेच ते भाजपचे दिवंगत नेते उदय वाघ यांच्या पत्नी आहेत. स्मिता वाघ यांच्याकडे जळगावात आदराने पाहिलं जातं. त्यांचा समर्थक वर्ग मोठा आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत भाजपला त्याचा फायदा होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे जळगाव लोकसभा मतदारसंघ हा भाजपचा बालेकिल्लाच मानला जातो. असं असलं तरी आगामी काळात काय निकाल येतो ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

रावेर लोकसभा मतदारसंघात रक्षा खडसे यांना संधी देण्यात आली आहे. रक्षा खडसे यांच्या उमदेवारीबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरु होत्या. रक्षा खडसे या राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांच्या सून आहेत. त्यामुळे त्यांची उमेदवारी रद्द केली जाईल, अशी चर्चा होती. पण त्यांना पक्षाकडून संधी देण्यात आली आहे.

अकोला मतदारसंघातून अनूप धोत्रे यांना संधी देण्यात आली आहे. अनूप धोत्रे हे अकोल्याचे विद्यमान खासदार संजय धोत्रे यांचे चिरंजीव आहेत. संजय धोत्रे हे चारवेळा खासदार म्हणून अकोल्यातून निवडून आले आहेत. वर्धा मतदारसंघातून रामदास तडस यांना संधी देण्यात आली आहे. रामदास तडस हे २०१४ च्या निवडणुकीत निवडून आले होते. तसेच २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ते निवडून आले होते.

### आणखी कुणाकुणाला उमेदवारी ?

**नागपूर - नितीन गडकरी**

**चंद्रपूर - सुधीर मुनगंटीवार (सुधीर मुनगंटीवार यांना लोकसभा निवडणूक लढवण्याची इच्छा नव्हती. पण पक्षाने त्यांना उमेदवारी दिली आहे)**

**नांदेड - प्रताप पाटील चिखलीकर (चिखलीकर यांच्याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरु होत्या. पण अखेर त्यांनाच उमेदवारी मिळाली)**

**जालना - रावसाहेब दानवे**

**दिंडोरी - भारती पवार**

**भिंवडी - कपिल पाटील**

**उत्तर मुंबई - पियूष गोयल**

**मुंबई उत्तर पूर्व - मिहिर कोटेचा**

**पुणे - मुरलीधर मोहोळ**

**अहमदनगर - सुजय विखे पाटील**

**बीड - पंकजा मुंडे**

**लातूर - सुधाकर श्रृंगारे**

**माढा - रणजितसिंह निंबाळकर**

**सांगली - संजय काका पाटील**

# 'सत्तेत आल्यास शेतकरी कर्जमाफीसाठी आयोग नेमणार, अग्निवीर योजनेची समीक्षा करणार'

### काँग्रेसचं मोठं आश्वासन

काँग्रेस पक्ष सत्तेत आल्यास कर्जमाफी संदर्भात एक आयोग स्थापन करून शेतकऱ्यांनी बँकांकडून घेतलेल्या कर्जाची माहिती संकलीत केली जाईल व कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला जाईल. अग्निवीर योजना ही देशाच्या सुरक्षेला धोकादायक आहे, या योजनेचीही समिक्षा केली जाईल, असे जयराम रमेश यांनी सांगितले 'सत्तेत आल्यास शेतकरी कर्जमाफीसाठी आयोग नेमणार, अग्निवीर योजनेची समीक्षा करणार', काँग्रेसचं मोठं आश्वासनधुळे- भारत जोडो न्याय यात्राचे पाच न्याय स्तंभ आहेत व १४ जानेवारीपासून आतापर्यंत शेतकरी न्याय, युवा न्याय,



भागिदारी न्याय व महिला न्याय गॅरंटी जाहीर केल्या आहेत. पाच गॅरंटीमधूनकाँग्रेसचाहा २० कलमी कार्यक्रम असून ही गॅरंटी एका व्यक्तीची नाही तरकाँग्रेसपक्षाची आहे. राजकीय शब्दकोषात गॅरंटी हा शब्द वापरणारा देशातील पहिली व्यक्ती राहुल गांधी आहेत. कर्नाटक विधानसभा निवडणुक प्रचारावेळी त्यांनी पाच गॅरंटी जाहीर केल्या होत्या त्यानंतर तेलंगणातही अशाच गॅरंटी जाहीर केली होत्या आता या गॅरंटींची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. त्यावेळी या गॅरंटी शब्दावर भाजपाने टीका केली होती परंतु आज दररोज मोदी गॅरंटी, मोदी गॅरंटी यावरच त्यांना भर द्यावा लागत आहे, असा हल्लाबोल अखिल भारतीय काँग्रेस कमिटी मीडिया विभागाचे प्रभारी जयराम रमेश यांनी केला आहे. तसेच काँग्रेस पक्ष सत्तेत आल्यास कर्जमाफी संदर्भात एक आयोग स्थापन करून शेतकऱ्यांनी बँकांकडून घेतलेल्या कर्जाची माहिती संकलीत केली जाईल व कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला जाईल. अग्निवीर योजना ही देशाच्या सुरक्षेला धोकादायक आहे, या योजनेचीही समिक्षा केली जाईल, असेही जयराम रमेश यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेला संबोधित करताना जयराम रमेश म्हणाले की, महिला न्याय गॅरंटीची घोषणा ही ऐतिहासिक व क्रांतीकारी आहे. मोदींनी १० वर्षात दिलेली एकही गॅरंटी पूर्ण केलेली नाही. देशातील काही मुठभर लोकांना मोदी सरकारने १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले पण शेतकऱ्यांचे कर्जमाफ केले नाही. युपीए सरकारने मात्र शेतकऱ्यांचे ७२ हजार कोटी रुपयांचे कर्जमाफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता.

## पाहिजेत

राजदंड

२५ वर्ष सातत्याने प्रसिद्ध होणाऱ्या दै राजदंडसाठी पश्चिम महाराष्ट्रात तालुका व जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहे. आपल्या परिसराची भौगोलिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक जाण असलेल्या, मराठी भाषेवर प्रभुत्व असलेल्या आणि जनसंपर्क असलेल्या उमेदवारांनी संपर्क साधावा. उमेदवार पदवीधर असावा. पत्रकारिता व जनसंपर्क विषयात प्रशिक्षण घेतलेल्या व माध्यम क्षेत्रात किमान अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य

संपर्क: rajdand.pune@gmail.com

# श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटण डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

**फलटण :** श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण यांना महाराष्ट्र शासन समाजकल्याण विभागाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने मुंबईतील शानदार सोहळ्यात आज (मंगळवारी) सन्मानित करण्यात आले.

२५ हजार रुपये रोख, सन्मान चिन्ह, सन्मान पत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

संस्थेचे मानद सचिव डॉ. सचिन सुभाषराव सूर्यवंशी बेडके आणि सोसायटी नियामक मंडळ सदस्या सौ. ज्योतीताई सचिन सूर्यवंशी बेडके यांनी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्याकडून हा पुरस्कार सन्मानपूर्वक स्वीकारला, त्यावेळी उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांच्यासह अन्य मंत्रीगण व अधिकारी उपस्थित होते.



**मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार स्विकारताना डॉ. सचिन सूर्यवंशी बेडके व सौ. ज्योती सचिन सुर्यवंशी बेडके शेजारी उपमुख्यमंत्री ना. अजित पवार व अन्य मान्यवर.**

समाजकल्याण क्षेत्रात मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अन्याय व अंधश्रद्धा निर्मुलन, जनजागरण वगैरे क्षेत्रातील गेल्या १० वर्षांहुन अधिककाळ कार्यरत असलेल्या श्रीराम एज्युकेशन सोसायटीच्या कामाची दखल घेऊन त्यांची सन २०२२ - २३ या वर्षातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून आज प्रत्यक्ष या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल विविध स्तरावरुन संस्थेचे अभिनंदन होत आहे.

# वर्ग एक करण्यासाठी आता भरावी लागणार जादा रक्कम

## कोल्हापूर जिल्ह्यात सर्वाधिक जमिनींचे प्रस्ताव 'या' तालुक्यातील

**कोल्हापूर :** भोगवटादार वर्ग २ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग १ रूपांतर करण्यासाठी सवलतीच्या दराची मुदत ८ मार्चला संपल्यामुळे आता या कामासाठी संबंधित शेतकऱ्यांना जादा रक्कम भरावी लागणार आहे. वर्ग दोनमधून वर्ग एकमध्ये रूपांतरित करण्यासाठी सर्वाधिक जमिनींचे प्रस्ताव करवीर आणि गगनबावडा येथील शेतकऱ्यांचे आहेत.

कृषी वापरासाठी वितरित केलेल्या जमिनीसाठी सध्या बाजारमूल्याच्या ५० टक्के अधिमूल्य रक्कम भरण्याची सवलत आहे. मुदतवाढ न मिळाल्याने आता ७५ टक्के रक्कम भरावी लागणार आहे. वाणिज्य, औद्योगिक वापरासाठी वाटलेल्या जमिनीसाठी ५० टक्के रक्कम भरण्याची सवलत आहे. मुदतवाढ न मिळाल्याने या जमिनींसाठी ६० टक्के रक्कम भरावी लागणार आहे.



रहिवाशासाठी कब्जेहक्काने वाटलेल्या जमिनींसाठी १५ टक्के भरण्याची सवलत होती, ती आता ६० टक्के इतकी वाढणार आहे. रहिवासासाठी भाडेपट्ट्याने वाटलेल्या जमिनीसाठी २५ टक्के सवलत होती, ती आता ७५ टक्के इतकी होणार आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्ट्याने वाटलेल्या जमिनींसाठी १५ टक्के सवलत होती, तीही ७५ टक्के इतकी वाढलेली आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांना कब्जेहक्काने वाटलेल्या जमिनींसाठी १५ टक्के सवलत होती, तीही ६० टक्के इतकी होणार आहे.

पाच वर्षे मिळाली होती सवलत..

भोगवटादार वर्ग २ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग १ रूपांतर करण्यासाठी सवलतीचा दर आकारण्याबाबत ८ मार्च २०१९ रोजी शासन निर्णय झाला आणि तीन वर्षांची मुदत दिली होती.

ही मुदत ८ मार्च २०२२ रोजी संपली, त्यानंतर त्याला लवकर मुदतवाढ मिळाली नाही.

या जमिनी वर्ग एकमध्ये रूपांतरित करण्यासाठी ७५ टक्के दर आकारण्यात येऊ लागले.

त्यालाही वर्ष होऊन गेले, तरी त्यावर निर्णय झाला नव्हता. यामुळे विविध लोकप्रतिनिधी, विविध संघटना, नागरिकांनी राज्य सरकारकडे पुन्हा मुदतवाढ मागितली. त्या पार्श्वभूमीवर राज्यपालांच्या आदेशानुसार राज्य शासनाने ८ मार्च २०२२ पासून ८ मार्च २०२४ पर्यंत दोन वर्षांची मुदतवाढ दिली. ही मुदत आता आज संपत आहे.

आता या सवलतीला पुन्हा मुदतवाढ मिळणार नाही हे स्पष्ट झाले आहे; परंतु आता शेवटच्या दिवशी सादर होणारी प्रकरणे तीन महिन्यांत निकाली काढण्यास मात्र सवलत मिळाली आहे.

# मावळ लोकसभेला सत्ताधाऱ्यांच्या विरोधात उभे करणार एक हजार उमेदवार



**वडगाव मावळ :** सरकारने मराठा समाजाची फसवणूक केली. या निषेधार्थ पुणे जिल्ह्यातील मावळ लोकसभा मतदार संघातून मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने हजारो उमेदवार उभे करणार असल्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या बैठकीत प्रत्येक गावातून २ उमेदवार देण्याचा निर्णय घेण्यात आला

मावळ लोकसभा मतदारसंघात मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाज व कार्यकर्त्यांची बैठक बुधवारी लोणावळा येथे पार पडली.यावेळी मावळ तालुका सकल मराठा समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता

मावळ लोकसभा मतदारसंघात चिंचवड, मावळ, कर्जत मोठ्या प्रमाणात मराठा समाज असल्याने त्यामुळे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मराठा समाजाच्या मतदानाचा प्रभाव हा उमेदवारांना दिसून येणार आहे

मावळ लोकसभा मतदारसंघात मराठा समाजाकडून उमेदवार देण्यात येणार आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात मराठा समाज हा स्वतंत्र उमेदवार देत असल्याने आता सर्वच पक्षांची गणित बिघडण्याची शक्यता आहे

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांना नवी मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरकारच्या वतीने 'सगेसोयरे'बाबतची अधिसूचना काढून आंदोलन स्थगित करायला लावले. अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करण्याचे वचन लाखो मराठा आंदोलकांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. १६ फेब्रुवारीपर्यंत यावर हरकती मागवल्या. त्याची मुदत संपून तीन आठवडे झाले. मात्र, अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर केले नाही नसल्याचा आरोप मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

# शिक्षक बँकेच्या माध्यमातून सभासदांचा आर्थिक विकास साधणार : किरण यादव

## फलटण तालुका प्राथमिक शिक्षक समितीतर्फे सत्कार

**कोरेगाव :** प्राथमिक शिक्षक बँकेने नेहमीच सभासदाभिमुख कारभाराला प्राधान्य दिले असून बँकेच्या माध्यमातून सभासदांचा आर्थिक विकास साधणार आहे, असे प्रतिपादन प्राथमिक शिक्षक बँकेचे नूतन अध्यक्ष किरण यादव यांनी केले.फलटण तालुका प्राथमिक शिक्षक समिती मार्फत ३८ शिष्यवृत्तीधारकांचा सन्मान करण्यात आला. बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल किरण यादव यांचाही सन्मान करण्यात आला.याच कार्यक्रमात शिक्षक समिती परिवारात दहा शिक्षकांनी प्रवेश केला. यावेळी श्री. यादव बोलत होते. शिक्षक समितीचे राज्य नेते उदय शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत व जिल्हाध्यक्ष विश्वंभर रणनवरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास सरचिटणीस संतोष मांढरे, कार्याध्यक्ष अनिल पिसाळ,कार्यालयीन चिटणीस अजित हिंगे, एस. के. जाधव, बँकेचे संचालक विशाल



**फलटण - किरण यादव यांच्या सत्कारप्रसंगी उदय शिंदे, विश्वंभर रणनवरे, संतोष मांढरे, अनिल पिसाळ,अजित हिंगे, एस. के. जाधव, विशाल कणसे , सौ. पुष्पलता बोबडे, धीरेश गोळे, संतोष कोळेकर निलेश कर्वे व इतर.**

कणसे , सौ. पुष्पलता बोबडे जिल्हा क्रीडा समन्वयक श्री. घाडगे, जावळी जावळी तालुका प्राथमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन धीरेश गोळे, तालुकाध्यक्ष संतोष कोळेकर, सरचिटणीस निलेश कर्वे उपस्थित होते.किरण यादव पुढे म्हणाले, प्राथमिक शिक्षक बँकेत कधीही चुकीच्या प्रकारांना थारा दिला जात नाही. सभासदांनी ज्या विश्वासाने बँकेची सत्ता ताब्यात दिली आहे त्या विश्वासाला कुठेही तडा जावू दिला जाणार नाही. निवडणुकीवेळी दिलेल्या आश्वासनांची पुर्तता संचालक मंडळ करत असून शिक्षक सभासदांसाठी भविष्यात आणखी नवनवीन योजना आणून शिक्षक सभासदांचा आर्थिक विकास साधला जाईल. उदय शिंदे म्हणाले, शिक्षक समिती ही राज्यव्यापी संघटना असून संघटनेच्या माध्यमातून सभासदांचे मोठे जाळे निर्माण करण्यात आले आहे. शिक्षक समिती म्हणजे विश्वास ही संकल्पना दृढ झाल्याने आज शिक्षक समितीत अनेकजण प्रवेश करत आहेत. यावेळी सौ. करुणा मोहिते, संभाजी बिटले, रामचंद्र बागल, संजयकुमार देशमुख, प्रशांत खताळ, विक्रम घाडगे, सौ.जयश्री कदम, सौ.शोभा झेंडे, सौ. तिलोत्तमा लोखंडे,सौ.सारिका खताळ,सौ. अनुराधा लंबाते,सौ.शारदा अडसूळ,सौ. विजया पोमणे, सतीश नलवडे, नवनाथ धुमाळ, भगवंतराव कदम,अनिलकुमार खुडे, रवींद्र सपकाळ, विकास भुजबळ,शशिकांत कदम, संजय बोबडे,सुभाष बोबडे,रमेश जाधव,दादासाहेब नाळ,दत्ता मान,हरिश्चंद्र वाघ, यशवंत कारंडे,विजयकुमार शिपटे,रवींद्र जंगम,रमेश जाधव,धनाजी कदम,विठ्ठल शिंद,संतोष रणवरे,विनोद शिलवंत,देवराव जाधव, सेवानिवृत्त शिक्षक रामचंद्र शेडगे,सुभेदार डूबल, आनंदराव शिंदे,सोमनाथ धायगुडे,ताराचंद जगताप,बाबूलाल ढोणे,यशवंत कदम,दत्ता जानकर, नितीन करे,बाळकृष्ण गायकवाड,राजेंद्र सरक,संदीप कोळेकर, विकास सोनवणे, संतोषकुमार पाटणे, भोलचंद बरकडे,नाना शिंगाडे आदी उपस्थित होते.

### कलावंत मानधन योजना केवायसी वेळेत करण्याचे आवाहन

**सातारा :** सातारा जिल्ह्यातील कलावंत वृध्द साहित्यिक व कलावंत मानधन योजनेचा लाभ घेत आहेत. त्यांनी सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे स्तरावर वृध्द साहित्यिक व कलावंताचे आधार कार्ड, मोबाईल क्रमांक व बँक खाते क्रमांकांची माहितीचे अद्यावतीकरणाची मोहीम सुरु करण्यात आलेली आहे,

# लोकसभेची उमेदवारी कोणालाही मिळो प्रामाणिकपणे मतदान

## साताऱ्यातील ज्येष्ठ नागरिकांचे मनोगत

**सातारा :** सातारा लोकसभा मतदारसंघात सध्या महाविकास आघाडी व महायुती यांची जोरदार तयारी सुरू झालेली आहे. नेमकी उमेदवारी कोणाला मिळेल याबाबत फक्त अंदाज वर्तवण्यात येत आहेत. परंतु, ज्योतिषांना सुद्धा नेमकी उमेदवारी कोणाला मिळेल ? हे सांगता येत नाही. असे असताना आता उमेदवारी कोणालाही मिळून आपण आपलं प्रामाणिक मतदान करायचं असा निर्धार अनेक ज्येष्ठ नागरिकांनी सातारा जिल्ह्यात घेतला आहे.

सातारा लोकसभा मतदार संघामध्ये किमान पाच उमेदवार उभे राहतील. असा प्राथमिक फक्त अंदाज आहे. यापेक्षाही अधिक उमेदवारी दाखल होऊ शकते. सातारा जिल्ह्यामध्ये मराठा क्रांती मोर्चा व त्याच्या समर्थक हे जरी भाजपसोबत मोठ्या संख्येने असले तरी जर मराठा क्रांती मोर्चा ने उमेदवारी दाखल करायचा निर्णय घेतला तर मराठा क्रांती मोर्चा समन्वय व त्यांच्याशी निगडित असलेले किती जण अर्ज दाखल करतील ? हे सांगणे कठीण आहे. कारण, मराठा क्रांती मोर्चाच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या मागे नेते आहेत. आणि नेत्याचे प्रमोशन करण्यासाठी कार्यकर्ते सज्ज झालेले आहेत.

सध्या सातारा लोकसभा मतदारसंघांमध्ये राजकीय पक्ष तयार आहेत. पण उमेदवार ठरेना याचे कारण ही स्पष्ट आहे. पूर्वी कोणता उमेदवार कोणत्या पक्षाचा असेल हे छातीठोकपणाने सांगितले जात होते. आता राजकीय फेरबदल होत असल्यामुळे काल-परवा महायुतीचे उमेदवार म्हणून त्यांच्यासाठी प्रचार यंत्र राबवत होते. आज ती यंत्रणा थंडावली आहे. कारण, ते उमेदवार जर महाविकास आघाडीतून निवडणूक लढवले तर पंचायत होणार आहे. त्यामुळे सर्वजण सावध पाऊल टाकत आहे. मराठी पाऊल पडते पुढे.. हे गीत होते. पण आता पाऊल टाकताना सुद्धा मराठी पाऊल पडते पुढे याचे ऐवजी पहिलं कोण उमेदवारी जाहीर करून पाऊल टाकते ? याची वाट पाहिली जात आहे. सध्या ज्येष्ठ नागरिक प्रामाणिक प्रयत्न म्हणून मतदान करतील .कारण त्यांनी राजकीय भूमिका कधी बदलली नाही. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत ज्यांना मतदान करा. असे सांगितले. त्यातील बऱ्याच मंडळींनी आता पक्ष बदललेले आहे. गट बदललेला आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना सुद्धा मतदान करताना नेमकी चॉईस कुणाची करावी ? हा नक्कीच प्रश्न पडणार आहे.

# सातारा जिल्ह्यात आमदार शशिकांत शिंदे व सहकाऱ्यांनी भेदली तुतारी

**सातारा :** महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सर्वाधिक चर्चे तील कुटुंब म्हणजे पवार कुटुंबीय हे एक समीकरण झाले आहे. परंतु अलीकडच्या काळात सत्तेच्या खेळामध्ये विभक्त अनेक कुटुंब झाली आहेत. त्यामुळे राजकीय पक्षाचे शकले पडले आहेत .राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात दोन गट पडले. सातारा जिल्ह्यात आमदार शशिकांत शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन चिन्ह तुतारी ही जनमानसात पोहोचवण्याचे काम सुरू केलेले आहे. खटाव तालुक्यातील विसापूर नजीकच्या बुधावलेवाडीत एका कलावंतांनी फुंकलेली तुतारी म्हणजे खऱ्या अर्थाने प्रचाराचीच रणसिंग मानले जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या निर्मितीनंतर गेली २४ वर्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी पश्चिम महाराष्ट्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. एवढेच नव्हे तर हुमगाव ता. जावळी च्या सुपुत्राने मतदार संघाची फेररचना झाल्यानंतर कोरेगाव मतदार संघात



स्थायिक होऊन त्या ठिकाणीही आमदारकी व जलसंपदा मंत्रीपद मिळवले. आपले राजकीय कारकीर्द घडवणारे ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार साहेब व अजित पवार आणि इतर नेत्यांबद्दल त्यांच्या मनात आजही आदर आहे. परंतु राष्ट्रवादीची फेर बांधणी करण्यासाठी त्यांनी हाती तुतारी घेतलेली आहे.

या तुतारी सोबत आमदार शशिकांत शिंदे यांची छबी आमचे प्रतिनिधी अजित जगताप जगताप यांनी टिपलेली आहे.या वेळेला नूतन रस्त्याचे भूमिपूजन व मतदारांची संवाद साधण्यात आला.

# राजगुरुनगर येथे महिला दिनानिमित्त सखी मेळावा संपन्न

**राजगुरुनगर :** राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू सोशल फाऊंडेशन संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त सलग तिसऱ्या वर्षी दोन दिवस सखी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

खेड उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील, ए.पी. आय .स्नेहल गुरव यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत चंद्रमा गार्डन येथे मेळाव्याचे उद्घाटन झाले.यावेळी राजगुरुनगर नगर परिषद मधील सफाई कामगार महिलांना सनकोट वाटप करण्यात आले.

राजगुरुनगर शहरातील तसेच उत्तर पुणे जिल्ह्यातील महिला बचत गट,तसेच महिलांनी तयार केलेल्या विविध खाद्य पदार्थ, वस्तू यांचे सत्तर स्टॉल लावण्यात आले.मुलांची खेळणी तसेच कपडे ,पुस्तके,अलंकार ,आरोग्य असे विविध प्रकारचे स्टॉल असल्याने दोन दिवसात मेळाव्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला.साधारण दहा हजार नागरिकांनी यात हजेरी लावली.

या मेळाव्यास आमदार दिलीप शेठ मोहिते पाटील,जिल्हा परिषद सदस्य बाबाजी



काळे,अतुल देशमुख,मा.जिल्हा परिषद सदस्या सुरेखा ताई मोहिते पाटील,पंचायत समिती सदस्य सुनीता ताई सांडभोर,राजगुरुनगर सहकारी बँक उपाध्यक्ष अविनाश कहाने,संचालक गणेश थिगळे,रोटरी क्लब अध्यक्ष दत्ता रुके, सुनिती ज्वेलर संचालक लखीचंद कटारिया ,यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यांसह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली.

मेळाव्याचे आयोजन हुतात्मा राजगुरू सोशल फाऊंडेशन संस्थेच्या वतीने करण्यात आले होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष दिलीप होले,उपाध्यक्ष संगीता तनपुरे,कार्याध्यक्ष डॉ.नीलम गायकवाड,सचिव अमर टाटीया ,मीनाक्षी पाटोळे, यांसह ऍड मनिषा पवळे, ऍड,सुनील वाळुंज, ऍड,सचिन वाळुंज ऍड,साधना बाजारे,राजन जांभळे, संतोष सांडभोर,बाळासाहेब सांडभोर,राहुल वाळुंज ,राहुल मलघे,शिल्पा ताई बुरसे ,नाझनिन शेख प्रियांका दिघे , डॉ.वंदना शेवाळे,उत्तम राक्षे,संपदा ताई सांडभोर, मधुकर गिलबिले, दत्ता रुके ,आकाश बोंबले,यांनी योगदान दिले. कार्यक्रम प्रास्ताविक मीनाक्षी पाटोळे तर सूत्रसंचालन डॉ.नीलम गायकवाड,आकाश बोंबले, मधुकर गिलबिले गुरुजी यांनी केले .आभार दिलीप होले यांनी मानले.

# वडगाव नगरपंचायतीचा बिल्डर धार्जिणा विकास आराखडा

## वडगाव शहर भाजपाचा आरोप

**वडगाव मावळ :** वडगाव मावळ नगरपंचायत प्रशासनाने शहराचा विकास आराखडा नुकताच सादर केला. हा विकास आराखडा सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा नसून तो केवळ बिल्डर धार्जिणा असल्याचा आरोप वडगाव शहर भाजपकडून करण्यात आला आहे.याबाबत वडगाव शहर भाजपा व स्थानिक शेतकरी ग्रामस्थांच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.

याप्रसंगी मा सभापती गुलाबराव म्हाळसकर, मा उप सभापती गणेशआप्पा ढोरे,मनसे तालुका अध्यक्ष रुपेश म्हाळसकर,मा प्रभारी सरपंच संभाजी म्हाळसकर, सचिन(बाळा) ढोरे,मा



अध्यक्ष सोमनाथ ढोरे,किरण भिलारे,मा नगरसेवक किरण म्हाळसकर,भुषण मुथा,शरद मोरे,रविंद्र म्हाळसकर, गणेश भेगडे,युवक अध्यक्ष विनायक भेगडे, सरचिटणीस मकरंद बवरे, वडगाव मनसे अध्यक्ष तानाजी तोडकर,शांताराम म्हाळसकर,मा ग्रामपंचायत सदस्य,महादू कुडे,महेंद्र म्हाळसकर,प्रफुल कुलकर्णी आदिजण उपस्थित होते.

जिल्हाधिकारी यांचेकडून मंजूर झालेल्या ओपन स्पेस एमिनिटी स्पेस ह्या जागा आपण प्रथम पब्लिक युटीलिटी, म्हणजेच क्रिडांगण,अथवा गार्डन,व्यायामशाळा, वा अन्य बाबींसाठी,नागरिकांच्या सोयीकरिता ताब्यामध्ये घ्याव्यात तसेच स्थानिक शेतकरी यांनी अनेक वर्षांपासून जपून ठेवलेल्या जमिनींवर टाकलेले आरक्षण काढून, ते त्वरित रद्द करावे.

आंबेडकर कॉलनी मधील,हातावर पोट भरणारे गोरगरीब जनतेच्या घरावर पार्किंग व किफायतशीर घरे याकरिता आरक्षित दाखवले आहे, ते सुद्धा रद्द करणेत यावे. शेतकऱ्यांच्या माळरान सपाट जमिनीवर वनीकरण असा शेरा दिसत असून तो सुद्धा रद्द करणेत यावा. अशा प्रमुख मुद्याचा गांभीर्याने विचार करून वडगाव मधील सर्व सामान्य कामगार वर्ग, शेतकरी आणि व्यापारी यांना योग्य तो न्याय मिळवून द्यावा अशी मागणी वडगाव शहर भाजपाने निवेदनद्वारे व प्रत्यक्ष बोलून मुख्याधिकारी प्रविण निकम यांचेशी सकारात्मक चर्चा केल्याचे भाजपा शहराध्यक्ष अनंता कुडे यांनी सांगितले.

यावेळी निवेदनावर स्थानिक व्यापारी व शेतकरी यांचे सह्या घेऊन निवेदन देण्यात आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# महापालिका विभागांमध्ये कागद विरहीत कार्यप्रणालीची अंमलबजावणी सूरू

## पाच प्रणालींचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते अनावरण; ३५ विभागाचा कारभार होणार ऑनलाईन

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेचा कारभार आता कागदविरहीत (पेपरलेस) होणार असून प्रशासनाने त्या दिशेने पाऊल टाकले आहे. महापालिकेत जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीमुळे सर्व कारभार ऑनलाईन करण्यावर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांनी भर दिला असून, विवाह नोंदणी प्रणाली, प्रेक्षागृह, नाट्यगृहे बुकींग, ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली, माहिती अधिकार प्रणाली, पशुवैद्यकीय व्यवस्थापन या विभागाच्या जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीचे अनावरण मंगळवारी स्थायी समिती सभागृहात आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले.

**महापालिकेच्या सर्व विभागांच्या अंतर्गत प्रशासन कार्यक्षमतेत सुधारणा करणे, नागरिकांसाठी ऑनलाइन सेवा सुलभ होण्याच्या दृष्टीने मनपा व स्मार्ट सिटी यांच्या वतीने जीआयएस सक्षण ईआरपी प्रणाली सुरु केली आहे. पारदर्शक प्रशासन व नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी ही प्रणाली कार्यरत करण्यात येत आहे. यामुळे, संबंधित विभागातील अधिकारी - कर्मचारी यांना निर्णय घेणे सोपे होणार आहे. तसेच, कामकाजाला गती मिळणार आहे.**

**- शेखर सिंह, आयुक्त - पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

यावेळी, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजय खोराटे, उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडमार्फत जीआयएस सक्षम ईआरपी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत महापालिकेच्या ३५ विभागाचे दैनंदिन कामकाज कागदविरहीत सूरू होईल. या कार्य प्रणालीनुसार यापुढे महापालिकेच्या विविध विभागांचे कामकाज ऑनलाईन चालणार आहे. या कार्यप्रणालीमुळे महापालिकेतील सर्व विभाग ऑनलाईन जोडण्यात येत आहेत.

**पशुवैद्यकीय विभागाच्या सुविधाही ऑनलाईन : -**
**ऑनलाईन प्रणालीद्वारे पाळीव प्राण्यांसाठी ऑनलाईन केस पेपरची व्यवस्था करण्यात आली आहे. ऑनलाईन पेमेंट, रेबीज प्रतिबंध उपाय - पाळीव प्राण्यांसाठी लसीकरणाची नोंद कार्ड, पाळीव कुत्रे / मांजराचा परवाना, परवाना नूतनीकरण, मृत पाळीव प्राण्यांच्या दहणासाठी परवानगी, पाळीव प्राणी दत्तक घेण्याची प्रक्रीया सहज करण्यात येणार आहे. तसेच, मनपाच्या अखत्यारितील प्राणी संग्रहालयात प्राण्यांची माहिती (हिष्ट्री कार्ड, पोस्टमार्टम रिपोर्ट, प्राण्यांची गणना) जतन करण्यात येणार आहे. डॉग पार्क आणि पाळीव प्राण्यांची सदस्यत्वासाठी ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे.**


**माहिती अधिकाराची प्रक्रीय सुलभ :-**
**माहिती अधिकार ऑनलाईन प्रक्रीयेत ऑनलाईन अर्ज करून माहिती मागविता येईल. विभागानुसार माहिती मागविण्याची व्यवस्था करण्यात आली असून, यामुळे विभागांचा वेळ वाचणार आहे. ऑनलाईन प्रक्रीयेमुळे वेळेची बचत होण्यास मदत होणार आहे. समाधानकारक माहिती न मिळाल्यास अपिल करण्याची सूविधा देखील यामध्ये करण्यात आली आहे.**

तसेच या प्रणालीमुळे नागरी सेवा-सुविधा, सर्व फाईल्सचे कामकाज ऑनलाईन दिसणार आहे. त्यामुळे महापालिकेतील अधिकारी - कर्मचा-यांचे श्रम वाचून व्यवहारात पारदर्शकता येणार असून फाईलला देखील दिरंगाई लागणार नाही.

महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयातील विवाह नोंदणी प्रमाणपत्र, सर्व नाट्यगृहाचे बुकींग, ग्रंथालये, पशुवैद्यकीय विभागातील श्वान परवाने, माहिती अधिकार अर्ज (आरटीआय), विविध विभागाचे कागदविरहित (पेपरलेस) ऑनलाईन कामकाज करण्यात येत आहे. आतापर्यंत नऊ विभागाचे कामकाज ऑनलाईन केलेले आहे. यापुढे अन्य उर्वरित विभागाचे कामकाज देखील ऑनलाईन करण्यात येणार आहे. जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीद्वारे नागरी सुविधा, सुरक्षा, ग्रंथालय, क्षेत्रीय कार्यालये, वैद्यकीय विभाग, भांडार विभाग यासह अन्य विभागाचे कामकाज ऑनलाईन होत आहे. याद्वारे महापालिकेच्या संबंधित विभागातील अधिकारी- कर्मचारी यांना आपल्या विभागातील सर्व माहिती ऑनलाईन उपलब्ध होणार आहे. महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीचा वापर सुरू केल्यास कामकाजाला गती येईल, शिवाय कामकाज संपूर्णपणे कागदविरहित (पेपरलेस) होणार असल्याने अधिक सुलभता येणार आहे. सर्व कार्यालये ऑनलाईन झाल्यास कामकाजाच्या फाइल्स, कागदपत्रे ऑनलाईन पाहता येतील, त्यामुळे कागदविरहित (पेपरलेस) सर्व फाईल्सला देखील मान्यता देता येणार आहे.

विवाह नोंदणी झाली सोपी :
पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना आता घरी बसून ऑनलाईन विवाह नोंदणी करता येणार आहे. कागदपत्रे अपलोड केल्यानंतर, मनपा क्षेत्रिय कार्यालयाकडून वेळ राखीव ठेवण्यात येणार आहे. मेसेज/ ई-मेलद्वारे राखीव तारीख व वेळेची सूचना, फोटो आणि बोटाचे ठसे घेण्याची सुविधा/ कागदपत्रांची पडताळणी, ऑनलाईन पेमेंट, ऑनलाईन विवाह नोंदणी प्रमाणपत्र, प्रमाणपत्रातील दुरुस्ती, विवाह संस्थांचे रजिस्ट्रेशन / संस्थांची पुर्ननोंदणी करता येणार आहे. यासह विवाह नोंदणीबाबतची माहिती संकलीत करण्यासाठी मनपा विभागास मदत होणार आहे.

# आली होळी ; बाजारपेठांमध्ये उत्साह



**नागपूर:** फाल्गुन पौर्णिमा अर्थात धुलिवंदनानिमित्त विविध बाजारपेठांमध्ये उत्साह संचारला आहे. रंग, गुलालासह विविध प्रकारच्या डिझाईनच्या फॅन्सी पिचकाऱ्यांची बाजारात रेलचेल आहे. दूरवर गुलाल उडविणाऱ्या बॅटरीवर चालणाऱ्या पायरो गन्स विक्रीस आल्या आहेत. याशिवाय इलेक्ट्रॉनिक्स पिचकारी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. या पिचकारीची किंमत २ हजार रुपयांपर्यंत आहे.-ऊाएठढखडएचएछढ-वी लूयावर्षी धुलिवंदन सोमवार, २५ मार्चला साजरा होणार आहे. लहान मुलांकडून दरवर्षी विविध प्रकारच्या पिचकाऱ्यांची मागणी वाढते. त्याकरिता किंमत दुय्यम बाब असून केवळ आवडती वस्तू हवी, असा त्यांचा अट्टहास असतो. बॅटरीवर चालणाऱ्या पिचकारीची मागणी वाढत किंमत एक हजार रुपयांपासून आहे. याशिवाय होळीमध्ये मोठ्या प्रमाणात गुलाल उडविण्यासाठी खास सिलिंडर्स आले आहेत. पायरो गन्स आणि गुलाल सिलिंडर धुलिवंदन सणात उत्साह वाढविणारे आहेत. या वसतू इतवारी, लोहा ओळीतील घाऊक विक्रेत्यांकडे विक्रीस आहेत.हर्बल गुलाल व रंगाकडे अनेकांचा ओढा

गेल्या काही वर्षांपासून लोक आरोग्यप्रति अधिक जागरूक झाले आहेत. त्यातच त्वचाप्रेमींचा हर्बल गुलाल आणि रंगाकडे ओढा वाढल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. साधा गुलाल १०० ते १५० रुपये आणि हर्बल गुलालाची किंमत ५०० ते ७०० रुपये किलो आहे. हा गुलाल लहान प्लास्टिकच्या डब्यामध्येही विक्रीस आहे. शिवाय रंगाची किंमतही एक हजारावर आहे. हे नैसर्गिक रंग खरेदीवर लोकांचा भर असल्याचे विक्रेत्यांचे मत आहे. शिवाय विविध आकार आणि प्रकारातील मास्क विक्रीस आहेत.यावर्षी किमतीत १५ ते २० टक्के वाढ

यावर्षी पिचकारी, मास्कच्या किमतीत १५ ते २० टक्क्यांची वाढ झाली आहे. बाजारात उपलब्ध बहुतांश वस्तू 'मेड इन इंडिया' आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर 'मेड इन चायना' आऊट झाल्याचे चित्र बाजारपेठांमध्ये दिसून येत आहे. मेक इन इंडियामध्ये लोकांना गणेश, मूर्गा आणि तोता ब्रँडचे रंग जास्त पसंतीचे आहेत. तसेच चांगल्या दर्जाचे गोल्डन रंग आणि वार्निश पॅकिंगमध्ये आहेत. यंदा सर्वाधिक उलाढाल होण्याची व्यावसायिकांना अपेक्षा आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहतमधील सदनिकेचे लोकार्पण

**बारामती :** देशामध्ये जोपर्यंत चंद्र सूर्य आहे ;तोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान कदापिही कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलले जाणार नाही, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बोलताना दिला.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ आणि बारामती नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक दुर्बल घटकांकरीता उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहतीचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. तसेच उघडा मारुती परिसरात नव्याने उभारण्यात येणाऱ्या सदनिका गृहप्रकल्पाचे भूमिपूजनदेखील श्री.पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाचे संचालक अनिल कानिटकर, संचालक प्रवीण कोळी, उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, बारामती सहकारी बँकचे अध्यक्ष सचिन सातव, बारामती हायटेक टेक्सटाईल पार्कच्या अध्यक्षा



सुनेत्रा पवार, माजी उपनगराध्यक्ष जय पाटील, बाळासाहेब जाधव, किरण गुजर, बिरजू मांढरे आदी आदी उपस्थित होते.

या प्रसंगी टेक्सटाईल पार्कच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार व

आयोजक स्थानिक नगरसेवक व माजी उपनगराध्यक्ष बिरजू मांढरे,मा. नगरसेवक किरण गुजर,मयुरी शिंदे, अनिता जगताप, नवनाथ बल्लाळ, अभिजित चव्हाण, शहर राष्ट्रवादीचे अध्यक्ष जय पाटील व माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब जाधव ,महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाचे तांत्रिक संचालक अनिल कानीटकर, प्रशासन संचालक प्रवीण कोळी ,नगरपरिषद चे मुख्यधिकारी महेश रोकडे व इतर मान्यवर उपस्थित होते.

संविधान बदलले जाणार असा अपप्रचार विरोधक मुद्दाम करत आहे त्यापासून सावध राहावे, असे आवाहन करून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले,डॉ आंबेडकर वसाहत चे सोंदर्य वाढले आहे त्यामुळे स्वछता राखा, व्यसने करू नका आणि गोर गरीबाच्या स्वप्नातील घरे पूर्ण होत असल्याबद्दल सर्वात जास्त समाधान होत व या पुढेही आमराई मधील जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र कार्य करणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

डॉ आंबेडकर वसाहतमध्ये गोर गरिबांचे हक्काचे अत्याधुनिक स्वतःचे घर पूर्ण करून त्यामध्ये राहण्याचा हक्क फक्त अजित दादांनी दिला आहे. त्यामुळे आजचा हा एतेहसिक दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल शासकीय योजना गोर गरीब जनतेसाठी तळागाळात आणण्याचे श्रेय फक्त अजित दादांना जाते जनता हे उपकार विसरणार नसल्याचे आयोजक नगरसेवक बिरजू मांढरे यांनी सांगितले.

# वेश्याव्यवसाय प्रकरणी ग्राहकांसह एजंट/लॉजिंग चालकाला अटक

**पन्हाळा :** पन्हाळ्यात माध्यवस्तीतील मयुरबन उद्यानात असलेल्या पन्हाळा नगरपरिषदे कडून दीर्घ मुदतीने भाडेतत्वावर घेतलेल्या लॉजिंगवर वेश्याव्यवसाय चालू असल्याचे समजल्या वरून अनैतिक मानवी वाहतूक कक्ष कोल्हापूर व पन्हाळा पोलिसांच्या संयुक्त पथकाने छापा टाकला.या छाप्यात पिडीत महिला, ग्राहक व एजंट /लॉज चालक यांना पोलिसांच्या संयुक्त पथकाने ताब्यात घेतले. याबाबत पन्हाळा पोलिसात गुन्हानोंद झाला असून एजंट लॉज चालक भगवान पांडुरंग भाकरे वय ४५ रा. पन्हाळा व शुभम झुंजारराव जाधव वय २६ रा. मणेर मळा उचगाव ता. करवीर या दोघांना ३२ हजार ३६ रुपये किंमतीच्या मुद्देमाला सह ताब्यात घेतले असलेची माहिती पन्हाळा पोलीसांनी दिली.


याबाबत पन्हाळा पोलिसांकडून मिळालेल्या माहिती अशी, पन्हाळ्यात माध्यवस्तीतील मयुरबन उद्यानात असलेल्या लॉजिंग इमारतीत वेश्याव्यवसाय चालू असल्याची पोलिसांना माहिती मिळाली होती.त्या माहीतीच्या आधारे दि.१३रोजी सायंकाळी या लॉजिंगवर पन्हाळा पोलीसांनी छापा टाकला. त्यावेळी तेथे शुभम हा पीडित महिलेला घेऊन आला होता. व त्याने भगवान याला दोन हजार रुपये देऊन त्याच्या लॉज मधील खोली भाड्याने घेतली होती. व तेथे पैशाचे प्रलोभन दाखवून गरीब असाह्य महिले कडून वेश्याव्यवसाय करून घेत असलेचे आढळून आल्याने. पोलिसांनी पीडित महीला,एजंट /लॉज चालक भगवान भाकरे यांचेसह ग्राहक शुभम जाधव यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांचे कडून पंधराशे रुपये रोख रक्कम व ३०हजार ३६रुपये किंमतीचे गाडी, मोबाईल फोन व इतर साहित्य असा मुद्देमाल जप्त केला.

# बिबट्याचा बंदोबस्त केला नाही तर वन विभागाला टाळे ठोकणार : प्रमोद खांडगे

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यात बिबट्याचे माणसांवर व पाळीव जनावरांवर होणारे वाढते हल्ले वन विभागाने रोखले नाहीत तर वन विभागाच्या कार्यालयाला टाळे लावण्यात येतील व बिबट्याला गोळ्या घालण्यात येतील असा सज्जड इशारा विविध शेतकरी संघटनेसह सकल मराठा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.



जुन्नर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर बिबट्याने पाळीव प्राण्यांबरोबरच मनुष्य प्राण्यावर देखील हल्ले करण्याचे सत्र सुरूच ठेवले आहे. मागील काही दिवसांमध्ये माणसांवर होणारे हल्ले तसेच नुकताच उंब्रज नंबर एक येथील आयुष सचिन शिंदे या चार वर्षाच्या बालकावर झालेला बिबट्याचा हल्ला यामुळे बागायती शेती परिसरात व ग्रामीण भागात राहणाऱ्या सर्वसामान्य ग्रामस्थांना जीव मुठीत घेऊन राहावे लागत आहे.बिबट्याच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे तसेच उपद्रवामुळे वैतागलेल्या शेतकरी संघटना, सकल मराठा संघटना यांनी वन विभागाला इशारा दिला आहे



# रक्तदान शिबीराचे आयोजन

**पन्हाळा :** सोमवार पेठ, पन्हाळा येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये संजीवन ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन पी. आर. भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन पी. आर. भोसले यांनी केले. यावेळी संस्थेचे सहसचिव एन. आर. भोसले आणि कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजीव जैन उपस्थित होते. समाजातील गरजू रुग्णांना रक्ताची मदत व्हावी म्हणून गेली अनेक वर्षे पी. आर. भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येते.

डॉ. अजित काटकर, पदविका प्राचार्य प्रा. निशांत थरकार आणि क्रीडा शिक्षक डॉ. रणजीत इंगवले यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या रक्तदान शिबिरामध्ये एकूण १८३ रक्तदात्यांनी रक्तदानाचा अधिकार बजावला. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. सुहास सपाटे, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. एकनाथ साळोखे, रजिस्ट्रार बाळासाहेब कुंभार, अधीक्षक दिपक पाटील, कृष्णात शिंदे, मेटकरी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# इतिहासाची पुनरावृत्ती होणार? माढ्यात 'कमळानं' डावललं, मोहिते पाटील हाती 'तुतारी' घेणार का?

**अकलुज :** २००८ साली माढा मतदारसंघाची निर्मिती होऊन प्रथम शरद पवार २००९ ला पहिले खासदार झाले त्यानंतर २०१४ साली पुन्हा शरद पवार उभे राहणार असल्याची चर्चा होती. राष्ट्रवादी पक्षाने शरद पवार यांची उमेदवारी ही जाहीर केली होती. त्यावेळी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील राष्ट्रवादीकडून इच्छुक होते पण पक्षाने त्यांना उमेदवारी दिलेली नव्हती आणि शरद पवाराची उमेदवारी फिक्स झाली होती. माढा मतदारसंघात होती त्यासदरम्या माढा शरद पवार पाडा अशा आशेची पोस्ट दहा-पंधरा दिवस फिरत होत्या त्यावेळी पोस्ट फिरल्यामुळे शरद पवार यांनी आपली उमेदवारी माघारी घेतली होती त्या पोस्टी ची दास्ती घेऊन शरद पवार यांनी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांना उमेदवारी देऊन उमेदवारी दिली होती. त्या मोदी लाटेत विजयसिंह मोहिते पाटील मोठ्या मताने निवडून आले होते. आता तर २०२४ ला माढा रणजीत सिंह नाईक निंबाळकर पाडा या पोस्ट मोठ्या प्रमाणात फिरत आहेत माळशिरस तालुक्यातून एक लाखाचे वर लिड निंबाळकर यांना दिले होते पण तेच कार्यकर्ते आता म्हणतात की एक लाखाने मायनस रणजीत निंबाळकर यांना मी मतदान होईल अशा पोस्ट फिरत असल्यामुळे भाजपने उमेदवार बदलावा यासाठी मोठा दबाव माळशिरस तालुक्यातून भाजपवर येत आहे. सध्या लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरु झाली आहे. सर्वच राजकीय पक्षांच्या हालचालींना वेग आलाय. भाजपने तर उमेदवारांची घोषणा देखील केलीय. यामध्ये माढा लोकसभा मतदारसंघात पुन्हा एकदा भाजपने रणजितसिंह निंबाळकरांना उमेदवारी दिलीय. या मतदारसंघातून माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचे पुतणे अकलूजचे धैर्यशील मोहिते पाटील इच्छूक होते. मात्र, भाजपनं त्यांना डावलले आहे. त्यामुळं कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होताना दिसत आहे. मोहिते पाटील यांनी शरद पवार गटाकडून तुतारी या चिन्हावर लोकसभा निवडणूक लढवावी अशी भावना कार्यकर्तेय व्यक्त करताना दिसत आहेत. त्यामुळं २०१४ च्या इतिहासाची पुनरावृत्ती माढा लोकसभा मतदारसंघात पुन्हा होणार का? हा चर्चेचा विषय ठरत आहेत. मोहिते-पाटील घराण्याला राज्याच्या राजकारणात मोठे स्थान सोलापूर जिल्ह्यातील अकलूज येथील मोहिते-पाटील घराण्याला



राज्याच्या राजकारणात मोठे स्थान आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली या घराण्यानं राजकारणात विविध पदांवर काम केलंय. सोलापूर जिल्ह्यात मोहिते पाटील यांची मोठी ताकद आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मोहिते पाटील यांचा गट सक्रिय आहे. त्यामुळं धैर्यशील मोहिते पाटील यांनी माढा लोकसभेची उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात होती. मोहिते पाटील यांचे गावोगावचे कार्यकर्ते उमेदवारी मिळणार म्हणून कामाला देखील लागले होते. पण अखेर रणजितसिंह निंबाळकरांना भाजपनं उमेदवारी दिल्यानं मोहिते पाटलांची कोंडी झालीय. त्यामुळं मोहिते पाटील बंडखोरी करत पवारांच्या पाठिंब्यानं हाती तुतारी घेणार का? असा सवाल उपस्थित केला जातोय. २०१४ ची पुनरावृत्ती होणार का? गेल्या



अनेक दिवसांपासून रणजिससिंह निंबाळकर आणि मोहित पाटील यांच्यात सुप्त संघर्ष सुरु होता. मोहिते पाटलांनी वेळोवेळी आपण माढा लोकसभेची निवडणुक लढवणार असल्याचे सांगितले होते. तर रणजितसिंह निंबाळकरांनी देखील पुन्हा भाजपचा मीच उमेदवार असल्याचा विश्वास व्यक्त केला होता. अखेर पुन्हा एकदा भाजपनं त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे. दरम्यान, मोहिते पाटील माढा लोकसभा निवडणूक लढवण्याच्या तयारीत असल्याची चर्चा जोर धरु लागली आहे. तर माढा लोकसभा मतदारसंघात २०१४ ची पुन्हा पुनरावृत्ती होणार असल्याची चर्चा सुरु आहे. कारण २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत राज्याचे माजी मुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी निवडणूक लढवली होती. अत्यंत अटितटीच्या या लढतीत मोहिते पाटील यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटेनेचे नेते सदाभाऊ खोत यांचा पराभव केला होता. यावेळी विजयसिंह मोहिते पाटील यांचे बंधू प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी देखील निवडणूक लढवली होती. २०१९ ला निंबाळकरांना माळशिरसमधून १ लाखाचा लीड २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत रणजितसिंह निंबाळकर यांच्या विरोधात शरद पवार यांच्या पाठिंब्यावर करमाळ्याचे विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांनी निवडणूक लढवली होती. यावेळी माळशिरस तालुक्यातील मोहिते पाटलांनी रणजितसिंह निंबाळकरांना १ लाखाच्या पुढे लीड दिलं होतं. यामुळं निंबाळकरांचा विजय सुकर झाला होता. पण मोहिते पाटील निंबळकरांनी सहकार्य करणार ही स्वतंत्र निवडणूक लढवणार हा चर्चेचा विषय ठरत आहे. राजकीय गणित काय? माढा लोकसभा मतदारसंघात माढा, करमाळा, माळशिरस, सांगोला, माण खटाव आणि फलटण या तालुक्यांचा समावेश होतो. यामध्ये माढा आणि करमाळा या तालुक्यात अजित पवार गटाचे आमदार बबनदादा शिंदे आणि आमदार संजयमामा शिंदे यांचे वर्चस्व आहे. हे दोन्ही बंधू रणजितसिंह निंबाळकरांना सहकार्य करणार आहेत. तर दुसरीकडं फलटणमधून दिपक चव्हाण हे देखील अजित पवार गटाचे आमदार आहेत. मात्र, ते माजी मंत्री रामराजे नाईक निंबाळकरांच्या मर्जीतले आहेत. रामराजे नाईक निंबाळकरांनी रणजितसिंह निंबाळकरांच्या उमेदवारीला विरोध केला होता. त्यांनी आपले बंधू संजीवराजे नाईक निंबाळकर यांनी उमेदवारी देण्याची मागणी केली होती. तसेच त्यांनी विजयसिंह मोहिते पाटील यांची देखील भेट घेतली होती. त्यामुळं फलटणमधून रामराजे नाईक निंबाळकरांचा रणजितसिंह निंबाळकरांना विरोध होण्याची शक्यता आहे. त्यामुळं धैर्यशील मोहिते पाटील यांनी जर निवडणूक लढवली तर रामराजे हे मोहिते पाटलांना सहकार्य करण्याची शक्यता देखील आहे. सांगोला मतदारसंघात शिंदे गटाचे शहाजीबापू पाटील आमदार आहेत. त्यांनी देखील निंबाळकरांना सहकार्य करण्याची भूमिका घेतलीय. तर दुसरीकडे कै. गणपतराव देशमुख यांचे नातू बाबाराजे देशमुख आणि अनिकेत देशमुख हे मोहिते पाटलांना सहकार्य करण्याची शक्यता आहे.

# क्राईम

## पोलीस असल्याची बतावणी करून एक लाखाचे दागिने लांबवले

**सातारा :** आम्ही पोलिस आहोत अशी बतावणी करून मॉर्निंग वॉक साठी बाहेर पडलेल्या वृद्धेचे एक लाख रुपये किमतीचे दागिने दोन अनोळखी इसमानी हातचलाखीने लांबवण्याचा प्रकार समोर आला आहे. दिनांक ११ मार्च रोजी सकाळी सव्वा सहा वाजता जिल्हा परिषदेच्या सिग्नल चौकामध्ये हा प्रकार घडला आशा राजू निकम वय ५५ राहणार साई कमल बंगला राहणार कोडोली यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सौ निकम या सकाळी फिरण्यासाठी बाहेर पडले असता जिल्हा परिषदेच्या चौकात आल्या. त्यावेळी अनोळखी दोघे त्यांच्याजवळ आले आणि आमची येथे पोलीस ड्युटी लागली आहे इतके दागिने घालून जाणे योग्य नाही असे त्यांनी सांगितले .त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून निकम यांनी गळ्यातले दागिने पुडीत बांधण्यासाठी दिले .अज्ञातांपैकी एकाने हात चलाखीने हे दागिने लांबवले पुढे गेल्यानंतर निकम यांनी पुडी उघडून बघितले असता त्यामध्ये दगड आढळून आले. ८० हजार रुपये किमतीचे दोन तोळ्याचे गंठण व वीस हजार रुपये किमतीची पाच ग्रॅमची सोन्याची अंगठी असा एक लाखाचा मुद्देमाल चोरीला गेला आहे पोलीस उपनिरीक्षक एस के गवळी अधिक तपास करत आहेत.

## धूम्रपान निषेध दिवसाबद्दल जिल्हा प्रशासनाला निवेदन सादर

**सातारा :** आज धूम्रपान निषेध दिवसाबद्दल युवकांचे शिष्ठमंडळ जिल्हाधिकारी सातारा यांना दुपारी २.३० वाजता भेट देऊन तंबाखू नियंत्रण कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी तसेच युवकांना व लहान मुलांना तंबाखूजन्य पदार्थां पासून दूर ठेवण्यासाठी मदत करावी अशी विनंती केली.

यावेळी अरविंद गवळी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, छ. शिवाजी कॉलेज ऑफ आर्टस, कर्मवीर भाऊराव पाटील ऑफ इंजिनीअरिंग कॉलेज चे विद्यार्थी रोहन कदम, तेजस देशमुख, सृष्टी जगताप, कार्तिकी देसाई, अथर्व कमले, संजना चव्हाण, आदित्य सुर्यवंशी, प्राची बामणे, कुंदन शिंदे, अभिजित मनोहर, आदित्य माने, सुचेता मुळे, प्रशांत कांबळे, कैलास जाधव, संतोष पाटील, प्रणव पवार, गौरव भंडारे, शेखर वायदंडे, अंकित शिंदे उपस्थित होते.

## साताऱ्यात दारु अड्डयावर छापा

**सातारा :** पोलिसांनी साताऱ्यात दारू अड्डयावर छापा टाकून १ हजार १९० रुपये किमतीच्या देशी दारूच्या बाटल्या हस्तगत केल्या.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि.११ मार्च रोजी ७.४० वाजण्याच्या सुमारास जयदेव विठोबा सोनमळे, रा. गुरुवार पेठ, गणेश मंदिराजवळ, सातारा हे देशी दारूच्या बाटल्या विकताना आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडून १ हजार १९० रुपये किमतीच्या देशी दारूच्या बाटल्या हस्तगत केल्या.

## महाबळेश्वरनजिक १० लाखांचे दारूचे बॉक्स हस्तगत

**सातारा :** महाबळेश्वर ता. महाबळेश्वर गावच्या हद्दीत एका ईरटीका कारमधुन पोलिसांनी १० लाख १ हजार ८०० रुपये किमतीचे दारूचे बॉक्स हस्तगत केले. संबंधित कारचा चालक मद्यप्राशन करून कार चालवीत असल्याचे आढळून आल्याने त्याच्यावरही महाबळेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, महाबळेश्वर ते माघंर जाणाऱ्या मार्गावर पोलीस पेट्रोलिंग करत असताना ईरटीका कार क्रमांक एम. एच. १२ व्हीजी ५४८० चा पोलिसांना संशय आल्यामुळे पोलिसांनी कार थांबून तिची तपासणी केली असता कारच्या पाठीमागील सीटवर दारूचे बॉक्स आढळून आले. पोलिसांनी १० लाख १ हजार ८०० रुपये किमतीचे दारूचे बॉक्स हस्तगत केले असून कार चालक हर्षल महेंद्र सिंघनकर, रा. जय भवानी नगर, कोथरूड, पुणे हा मद्यप्राशन करून कार चालवीत असताना आढळून आल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जिल्ह्यात लवकरच महाविकास आघाडीची वज्रमुठ सभा : आ. शशिकांत शिंदे

**सातारा ;** लोकसभेची निवडणूक ही गटातटावर नाही, तर लोकांचा कल काय यावर ठरणार आहे. एकदा लोकांनी ठरविले तर कोणी कोठे गेला, तरी काहीही फरक पडत नाही. भाजपकडे मोदींची गॅरंटी असली तरी आमच्याकडे आज जनतेची गॅरंटी आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत जनताच सत्ताधाऱ्यांना जागा दाखवून देईल, असा दावा राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे विधान परिषदेचे आमदार शशिकांत शिंदे यांनी केला. दरम्यान, निवडणूक काळात यंत्रणेचा गैरवापर करून जिंकण्याचा फंडा वापरला, तर तीव्र लढा उभारण्यात येईल असा इशाराही आ. शिंदे यांनी यावेळी दिला.



सातारा येथील राष्ट्रवादी भवनात सोमवारी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील घटक पक्ष, परिवर्तनवादी, पुरोगामी सामाजिक संघटनांच्या प्रमुख पदाधिकारी व समन्वयकांची इंडिया आघाडीची चौथी बैठक पार पडली. त्यात बुथ कमिट्या निश्चित करण्यात आल्या. या बैठकीत ठरल्याप्रमाणे स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी महाविकास आघाडी एकत्र येणार आहे, याची माहिती समन्वयकांच्यावतीने देताना पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुनील माने, काँग्रेस जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मोहिते, राजकुमार पाटील, नरेश देसाई आदी उपस्थित होते.

आ. शशिकांत शिंदे म्हणाले, स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा जिल्हा कायम ठेवण्याचा प्रयत्न राहिल. लोकशाही टिकावी म्हणून हा लढा आहे. आगामी निवडणूकीत कशी रणनिती ठेवायची त्यावर चर्चा झाली आहे. दरम्यान,सत्ताधाऱ्यांनी शासकीय यंत्रणेचा गैरवापर करून विरोधकांना नामशेष करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे ही लोकसभा निवडणूक स्वातंत्र्याची दुसरी लढाई आहे. इंडिया आघाडीचा उमेदवार कोणीही असला तरी सर्व घटकपक्ष एकजुटीने निवडणूक लढविणार आहेत. आगामी लोकसभेच्या दृष्टीने सर्व समन्वयक समित्या निश्चित झाल्या आहेत. यानंतर, घटक पक्षातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या तालुकनिहाय बैठका घेण्यात येणार आहेत. येत्या दोन-चार दिवसांत याबाबत सर्व जिल्हाध्यक्ष एकत्र बसून नियोजन करतील. लवकरच व्रजमूठ सभा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सातारा जिल्ह्यातील उमेदवार कोण, असा प्रश्न उपस्थित केला असता आ. शिंदे म्हणाले, इंडिया आघाडीची वरिष्ठ पातळीवर बैठक झाली आहे. वंचित आघाडीशी समन्वय झाल्यानंतर लवकरच उमेदवारांची यादी जाहीर होईल. उमेदवारी व जागवाटपावरून कोणतेही मतभेद नाहीत. कोणी काही भूमिका मांडली असली, म्हणजे विरोध असल्याचे समजू नये. इंडिया आघाडी केवळ लोकसभेसाठी नसून येणाऱ्या सर्व निवडणुका आता एकत्रित लढविल्या जातील, असेही आ. शिंदे यांनी स्पष्ट केले.

दुष्काळी खटाव, माणच्या पाण्याचा तांत्रिक वाद असेल पण जिसकी लाटी उसकी भैस असे होणार आहे. नियोजन करुन जनतेला पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे, यावर आम्ही आग्रही आहोत. सरकारने नियोजन करून जनतेला सांगितले पाहिजे. आजही शेती ऐवजी पिण्याला महत्व दिले गेले पाहिजे, पाण्याचा प्रश्न सुटला पाहिजे.

ऐनवेळी उमेदवार लादला जातो, उदयनराजेंना तिकीट देणार काय असा प्रश्न केला असता उदयनराजेंना भाजपाने तिकीट नाकारलं काय?, असा प्रतिप्रश्न पत्रकारांनाच आमदार शशिकांत शिंदे यांनी करत महायुतीत नितीन पाटील आणि छ. उदयनराजे यांच्या नावाची चर्चा आम्ही ऐकतो आहे, असे सांगत ते पुढे म्हणाले, आमच्याकडून श्रीनिवास पाटील, सुनील माने, सारंग पाटील यांच्या नावांची चर्चा आहे. माझं नाव असते तर मी पहिल्यांदाच सांगितले असते. मी फक्त कार्यकर्ता आहे. त्यामुळे मी उमेदवारीबाबत मागणी केली नाही.

लोकसभेची निवडणुक बॅलेट पेपरवर घेण्याबाबतचा प्रश्न केला असता ते म्हणाले, मोदींच्या मनात आले तर ते ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणूका घेतील, जनता सुद्धा तयार आहे, असे सांगत ते म्हणाले, महायुतीतले भाजपाचे खासदार एकदा बोलून गेले की दोन तृतीयांशी टक्के सदस्य निवडून आल्यावर भाजपाचा एकाधिकारशाही कारभार सुरु होईल, म्हणून चारशे पारचा नारा देत आहेत. मग त्यांना पक्ष का फोडावे लागले याचे उत्तर त्यांनाच माहित आहे. आतापर्यंतच्या अहवालानुसार राज्यात ४० पार होत नाही, असेही त्यांनी सांगितले. भाजपा आणि युपीए सरकारचा आजकाल सत्तेचा उपयोग हा विरोधकांना दाबण्यासाठी होत आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीपूर्वी असा ही उपयोग होऊ शकतो. याबाबत कार्यकर्त्यांनी मते व्यक्त केल्याचे त्यांनी सांगितले. महाविकास आघाडीचा उमेदवार कोण यापेक्षा आम्ही सर्वच उमेदवार म्हणून जोमाने काम करण्याचे ठरवले आहे. काही वेळी जरी मतभिन्नता असली तरीही तेवढ्यापुरती असते. सर्व पक्ष आम्ही एकदिलाने काम करणार असल्याचे शशिकांत शिंदे यांनी सांगितले.

# अखेर भोरमध्ये थकीतकर व्यावसायिक मालमत्ता सील

### भोर नगरपरिषदेचे अधिकारी अॅक्शन मोडवर

**भोर :** भोर शहरातील काही व्यावसायिक व्यापाऱ्याना वेळोवेळी नोटीस बजावली असून देखील गेल्या कित्येक वर्ष भोर नगरपरिषदेचा कर चुकवला असून मालमत्ता कर न भरल्याने भोर नगरपरिषदेचे अधिका री अक्शन मोडवर येत पहिल्या टप्प्यातील कारवाई करत मालमत्ता सील करण्याची प्रक्रिया सोमवार (दि.१२) रोजी सुरू करण्यात आली आहे. तरी व्यापा ऱ्यांसह नागरिकांनी थकीत कर लवकरात लवकर भरून भोर नगरपरिषदेला सहकार्य करावे व होणाऱ्या पुढील कारवाईस सामोरे जाऊ नये. असे आव्हान भोर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्रीराम पवार यांनी केले आहे.



भोर नगरपरिषदेची २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची थकबाकी वसुलीची कारवाई सुरु करण्यात आली असून भोर नगरपरिष देची कर वसुलीसाठी ९ विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.त्यानुसार कारवाईचे आदेश भोर शहरात सुरू असताना शहरातील मिळकतीं भोर नगरपरिषदेकडून सील करणेची कारवाई करण्यात आली.यामध्ये थकित कर मालमत्ताधारक मारुती भिमाजी साळुंके मालमत्ता क्र. ४५३८ व श्री शंकर बाबुराव ढवळे मालमत्ता क्र. ४५३३ यांची अनुक्रमे थकबाकी रक्कम ११,१५,२७४/-, व १०,९८,४२१/- इतकी थकबाकी असलेल्या मिळकती सील करणेत आल्या. तसेच सदरचे सील परस्पर तोडल्यास कायदेशीर गुन्हा दाखल करणेत येणार आहे तसेच पुढील टप्प्यात उर्वरित थकबाकीदारांवर करवाई करणार असल्याचे मुख्याधिकारी श्रीराम पवार यांनी सांगितले.

ही करवाई भोर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्रीराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कर विभाग स्वाती होले, बापु चोबे, ज्ञानेश्वर मोहिते, सागर कु-हाडे, अभिजीत गोंधळी, अभिजीत सोनावले, पवन भागणे, अर्चना पवार, अमोल जाधव,महेंद्र बांदल, दिलीप भारंबे, राजेंद्र राऊत, श्रीम. स्मिता गोडबोले तसेच इतर कर्मचारी यांचे पथकाकडून ही कारवाई करण्यात आली.

# श्री क्षेत्र महाबळेश्वर येथे महाशिवरात्री उत्साहात संपन्न

**महाबळेश्वर :** क्षेत्र महाबळेश्वर येथे महाशिवरात्री मोठ्या उत्साहात पार पडली अनेक भाविक भक्तांनी पहाटेपासूनच श्री महाबळेश्वर मंदिरात गर्दी केली होती श्री महाबळेश्वर महादेव मंदिरात फुलांची सजावट करण्यात आली होती.मंदिरात श्री महाबळेश्वराच्या दर्शनाला भाविकांची लांबच लांब रांग लागली होती.दुपारी १२ वाजता देवाला नैवेद्य दाखवून महाआरती करण्यात आली.यावेळी सातारा जिल्हा पोलिस अधीक्षक समीर शेख उपस्थित होते त्यांनी श्री महाबळेश्वराचे दर्शन घेऊन देवाची आरती केली तसेच मंदिर परीसरात भाविक भक्तांसाठी प्रसादाची सोय देखील करण्यात आली होती. यावेळी क्षेत्र महाबळेश्वर ग्रामपंचायतीचे



**श्री महाबळेश्वर मंदिरात भाविक श्री महाबळेश्वराचे दर्शन घेताना (छाया: शुभम गुरव)**

सरपंच सुनिल बिरामणे, उपसरपंच कल्पना कदम, ग्रामपंचायतीचे सदस्य, ग्रामसेवक प्रशांत रणपिसे, संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दशरथ पवार, राजेंद्र पुजारी, धनेश वाडेकर, प्रदिप कात्रट,सयाजी लांगी,आनंद कदम आदी उपस्थित होते.

## पन्हाळा शहरातील सोमेश्वर तलाव व साधोबा तलावाचे होणार सुशोभीकरण

**पन्हाळा:** पन्हाळा नगरपरिषदेस राज्य शासनाच्या विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत महाराष्ट्र शासनाने पन्हाळा शहरातील तलाव दुरुस्ती व सुशोभीकरण करिता साडे पाच कोटी रुपयांचे विशेष अनुदान मिळाले असल्याची माहिती मुख्याधिकारी चेतन कुमार माळी यांनी दिली. या रकमेतून पन्हाळा येथील ऐतिहासिक चार दरवाजा येथील साधोबा तलाव व परिसर सुशोभीकरणासाठी तीन कोटी रुपये. पन्हाळा येथील ऐतिहासिक सोमेश्वर तलाव दुरुस्ती व परिसर अंतर्गत विविध विकास कामे करणे करिता अडीच कोटी रुपये असे एकूण साडेपाच कोटी रुपयांचे अनुदान मिळाले आहे.

याबाबत आ. डॉ. विनय कोरे यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांच्या प्रयत्नातून पन्हाळा नगरपरिषदेस साडेपाच कोटी रुपये मिळाले आहेत, लवकरात लवकर नगरपरिषद मार्फत तलावांचे दुरुस्ती व सुशोभिकरण करणे कामास सर्व प्रक्रिया पूर्ण करून कामास सुरवात केली जाईल असे मुख्याधिकारी चेतनकुमार माळी यांनी सांगितले.

## माता रमाईचे विचार संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचवायला हवे : रमेश बागवे

**हडपसर पुणे :** माता रमाईने भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अतिशय प्रतिकूल परिस्थितीत साथ दिली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना रमाईची खंबीर साथ होती म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण घेऊ शकले ,ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्त माता रमाई बहुउद्देशीय महिला समाज संस्थेचे उद्घाटन आज होत आहे संस्थेच्या माध्यमातून रमाईचे विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचवायला हवे असे मत माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांनी केले.

या कार्यक्रमाचा आयोजन संस्थापक अध्यक्षा छाया जाधव यांनी केले होते.

या प्रसंगी अँड.अभय छाजेड,विठ्ठल गायकवाड,सोनाली मारणे ज्योती आरवेन, नलिनी दोडगे, शर्वरी गोतारणे,कांचन बालनायक,मोती ताई उडते, वासिमजी शेख संस्थेचे उपाध्यक्ष, सचिव,खजिनदार, सदस्य व सर्व पदाधिकारी,फुले -शाहू आंबेडकर चळवळीतील अनेक सामाजिक कार्यकर्ते, उपस्थित होते.

महिला दिनाचे औचित्य साधून महिलांचा संस्थेच्या वतीने सत्कार प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अभय छाजेड म्हणाले की, सामाजिक कार्य करण्यासाठी संस्था योग्य माध्यम आहे ही संस्था भविष्यामध्ये अग्रगण्य संस्था होण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत बहुउद्देशीय कार्य करणारी ही एक महिलांच्या प्रश्नावरती काम करणारी संस्था नावारूपाला आणावी,

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल गायकवाड यांनी केले राहुल जाधव यांनी आभार मानले.



# माण खटाव तालुक्यातील १६ गाव वाड्यावस्त्यांना ७ टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा

### शेखरभाऊ गोरेंचा सामाजिक उपक्रम

**दहीवडी :** माण- खटाव तालुक्यात तीव्र पाणीटंचाईला नागरीक सामोरे जात असून शासनामार्फत टंचाईग्रस्त गावे व वाड्यावस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे मात्र तोही अपुरा पडत आहे.त्यामुळे माण खटाव मतदारसंघात स्वखर्चातून विविध विकासकामे करणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेले शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख व सातारा जि.बँकेचे संचालक शेखर गोरे यांनी शेखरभाऊ गोरे प्रतिष्ठानतर्फे माण मतदारसंघातील १६ गावे व वाड्यावस्त्यांवरील पाणीटंचाईने हैराण झालेल्या नागरीकांना ७ टँकरने मोफत पाणीपुरवठा सुरू करत सामाजिक बांधीलकी जपत आहेत.

**माण मतदारसंघातील नागरीकांना टंचाई काळात पाण्यासाठी दाहिदाशी वणवण करावी लागू नये. यासाठी शेखर गोरे यांनी निस्वार्थी भावनेने स्वखर्चातून सन २०१२ पासून माण मतदारसंघात शेखरभाऊ गोरे प्रतिष्ठानतर्फे टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा करत आहेत.याहीवर्षी पाणीटंचाईची दाहकता वाढल्यानंतर स्वखर्चातून मागेल त्या गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्याचे काम ते करत आहेत. माण खटाव तालुक्यातील दहिवडी ता.माण येथील खरातवस्ती, डबरमळा, शिवाजीनगर, सरकारी दवाखाना, एकतानगर, पावतका खांडेवस्ती, निसर्ग कॉलनी, साईश अपार्टमेंट, एस.टी. स्टँड कॉलनी समर्थनगर, शिवशाही रेसिडेन्सी, बुरुंगले वस्ती, मुळीकवस्ती, प्रभाग नं.६ या परिसरातील नागरीकांना टँकरने पाणी पुरवले जात आहे. तरवडगाव, वावरहिरे, कोळेवाडी, कातरखटाव (शिंगाडवाडी), मांडवे (खटाव तालुका), मार्डी, भवानवाडी, बोथे, शिरवली, भालवडी, वाकी, नवलेवाडी यात्रा, वरुड यात्रा, पिंगळी खु येथील (कांबळेवस्ती,थोरात वस्ती), महिमानगड (पठारवस्ती) या १६ गावे व वाड्यावस्त्यांना ७ टँकरद्वारे ते मोफत पाणीपुरवठा करत आहेत.**

शासनाकडे पाण्यासाठी मागणी करून प्रस्ताव दिला जातो मग तो मंजूर होतो.मात्र शेखरभाऊ गोरेंच्या प्रतिष्ठानकडे कोणताही प्रस्ताव करावा लागत नसून फक्त आम्हाला पाणी हवय अशी मागणी केल्यास तात्काळ स्वखर्चाने टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. यासाठी त्यांनी पिंगळी येथील येथे स्वत:चे दोन फिडींग पॉईंट तयार केले आहेत.त्यावरून पाणी भरून मतदारसंघातील गावांना ते टँकरद्वारे पाणीपुरवठा करत आहेत.येणाऱ्या काळात पाण्याची मागणी वाढल्यास अजूनही टँकर वाढवले जाणार असल्याची माहिती ही प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात आली आहे.

माणचे लोकप्रतिनीधींनी स्वताच्या राजकीय फायद्यासाठी मतदारसंघात पाण्याचे व पाणीपूजनाचे इव्हेंट करत सुटले आहेत. त्यांना पाणीटंचाई दिसत नाही. माणखटावची जनता पाण्यासाठी वणवण करत असताना, मतदारसंघात पाणीपुरवठा करण्यासाठी टँकर सुरू असताना लोकप्रतिनिधी मात्र आंधळी धरणात बोटींग करून जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रयत्न करतायत. आम्ही प्रतिष्ठानच्या मार्फत निस्वार्थीपणे सामाजिक बांधीलकी जपत जनतेच्या प्रेमाखातर गेली अनेकवर्षे मागेल त्यांना पाणीपुरवठा करत असून याहीवर्षी टंचाई काळात मागेल त्यांना पाणी देणार आहे.

# गगनबावडा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा ४०० लोकांच्या उपस्थितीत मेळावा

**गगनबावडा :** गगनबावडा तालुक्यामध्ये अनेक पक्ष आहेत. त्यातील राष्ट्रीय काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेना भाजप बहुजन विकास आघाडी परंतु तालुक्यांमध्ये सतेज पाटील यांनी साखर कारखान्याच्या माध्यमातून व विकास कामाच्या जोरावर गट मोठा ठेवण्याचे काम केले. मागील जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये गगनबावडा तालुक्यातील सतेज पाटील यांच्या सत्तेला सुरुंग लावण्याचा महादेवराव महाडीक यांनी प्रयत्न केला परंतु त्याचा काहीच फायदा झाला नाही. त्याचवेळी प्रकाश पाटील यांना जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये मते विभागून पडल्यामुळे महाडिक यांच्या कार्यकर्त्यांचा पराभव झाला.




त्यातच काही ग्रामपंचायतीवर काँग्रेस राष्ट्रवादीची सत्ता आहे. गगनबावडा तालुक्यात प्रकाश पाटील यांनी गेली पंधरा वर्षे राष्ट्रवादी जिवंत ठेवली. त्याला आणखी उभारी यावी यासाठी राष्ट्रवादी पक्ष शरदचंद्र पवार गगनबावडा तालुक्यातील शेणवडे येथे मेळावा घेण्यात आला. या मेळाव्या प्रसंगी कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष व्ही बी पाटील म्हणाले इथून मागिल काळात अनेक वरिष्ट नेत्यांनी पक्षाच्या प्रगतीला खोडा घातला असला तरी इथून पुढे असे काहीही होणार नाही . पक्षाचे काम जोरात सुरू ठेवा आम्ही तुमच्या कायम पाठीशी उभे आहे. काही अडचण आल्यास डायरेक्ट माझ्याशी किंवा आर के पवार यांच्याशी संपर्क केला तर कधीही कसलीही तुम्हाला अडचण येणार नाही .महाराष्ट्रातील राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांचा अनेक राजकारण्यांनी बदनाम करण्याचा प्रयत्न केला. पण जी बदनाम आहेत ती

**असळज मतदारसंघातून २०१२ ला पंचायत समिती लढविली. त्यावेळी २000 मतदाराने दाखवलेला विश्वास व त्यांची परतफेड करण्यासाठी लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तालुक्यातील लोकांसाठी कायम लोकांच्या सेवेत राहून जनतेचे उपकार आयुष्यभर फेडणार. व गोरगरीब जनता शेतकऱ्यांसाठी संघर्ष करणार आहे.**

गेलेले आहेत. त्यामुळे त्यांचा विचार न करता आपण पक्ष कसा मोठा होईल याकडे लक्ष देणे फार गरजेचे आहे. तालुका महिला अध्यक्ष सुचिता पडवळ आपल्या मनोगतात म्हणाल्या, आज वर्तमानपत्र वाचत असताना महिलांच्या वर किती अन्याय होतो किंवा संकटांना समोर जावे लागते हे लक्षात येतं. म्हणून एकी हेच बळ असल्याने तालुक्यातील महिला संघटित होऊन प्रतिकार केला पाहिजे. याचदरम्यान तालुक्यातील वेगवेगळ्या पदाधिकारी पदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार करण्यात आले.यावेळी आर. के. पोवार, अश्विनी माने , आनंदा जाधव व पंडीत कळके पक्षाचे अनेक पदाधिकारी व तालुक्यातील विवेक सनगर, भिवाजी वरेकर, शब्बीर नाचरे , चंद्रकांत कांबळे, गजानन टक्के, आनंदा वापिलकर, धोंडीराम पाटील, श्रीकांत कांबळे , सायरा जमादार , प्रल्हाद शिंदे व सुहास गायकर इत्यादी व साधारण ४00 च्या आसपास कार्यकर्ते उपस्थित होते.